Maayboli.com

चित्रसंच - 3

मेघना गिते, ८ वर्षे

मराठी दिवस स्पर्धा

२/२०/१२

एक छोटा मुलगा होता. त्याचे नाव होते
रोहन. त्याला त्याच्या ७व्या वाढदिवसाला आजोबांनी
एक सुंदर जांभळी सायकल दिली होती. ती त्याला
इतकी आवडायची, की तो जरासाही वेळ मिळाला
की ती चालवायचा.

एकदा असाच सुट्टीत, रोहन सायकल
चालवत लांब गेला. त्याला एक जंगल लागले.
त्याला हे जंगल चांगले माहीती होते. जंगलात
खूप झाडे होती. झाडावर खूप पक्षी होते.
जरा पुढे, खूप सुंदर रंगीबेरंगी फुले होती.
रोहन मजेत पुढे चालला होता.

तेवढ्यात काय झाले काळे काळे ढग
आले, जोरात गडगडाट सुरू झाला. सगळे
छोटे छोटे प्राणी घाबरून गेले. ससे, खारी,
आणि पक्षी आपआपल्या घरात जाऊन
बसले. रोहनला पहिल्यांदा लक्षात आले नाही,
पण जेव्हा जोरात पाऊस सुरू झाला, तेव्हा त्यालाही
वाटायला लागले की अरे, पटकन घरी जायला
पाहीजे. पण, पाऊस फारच वाढला तेव्हा त्याला
"म्याव-म्याव" असा छोटासा घाबरलेला
आवाज आला. रोहनने इकडे तिकडे पाहीले त्याला
काहीच दिसले नाही. मग त्याने झाडावर पाहीले,
तर काय त्याला एक मांजरचे पिल्लू
झाडावर दिसले रोहनचे एक मन म्हणत होते,
"बिच्चारे पिल्लू, त्याला वाचवायलाच पाहिजे."
तर दुसरे मन म्हणत होते की "नाही, नाही पटकन
घरी गेले पाहीजे, आई ही वाट बघत असेल आणि
जास्त वेळ पावसात थांबले, तर इतकी सुंदर

नवीन. सायकल दिली आहे आजोबांनी,
ती गंजून जाईल ना!" सायकलचा विचार
मनात येताच रोहन पावसाची पर्वा न करता
सायकलवर बसून निघालाही, पण
पाऊस इतका वाढला, इतका वाढला, की त्याला
काहीच दिसेना, मग तो परत मागे फिरला.
तितक्यात काय झाले - रस्त्यात एक
फांदी पडली होती. ती अंधारात रोहनला
दिसली नाही, आणि रोहन व त्याची सायकल
दोघे दोन्ही मसापैकी हवेत उडाले. सायकल
एकीकडे जाऊन पडली आणि रोहनही
पडणार इतक्यात समोर एक झाडाची
फांदी आली आणि मांजराचे पिल्लूही
आले रोहनने पिल्लाला पकडले आणि
रोहन व मांजराचे पिल्लू खाली पडले.
रोहनला खरचटले थोडेसे, पण पिल्लाला
वाचवता आल्याचा त्याला फारच
आनंद झाला होता. तेवढ्यात पाऊसही
थांबला होता व एक छोटा मुलगाही आला
धावत धावत. तो त्याच्या मांजरीच्या पिल्लाला
शोधत होता. रोहनने त्याला पिल्लू दिले
आणि तो आनंदाने घरी गेला.

त्याने आज एक चांगले काम केले होते
व त्याला एक नवीन मित्रही मिळाला होता.